# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०१९/ 300

दिनांक :- 29 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या

पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनअंतर्गत ऑनलाईन लिंक बंद झाल्यानंतर त्रूटींची पुर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुर करण्याबाबतचा संस्थेचा प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक यांचे पत्र क्र.१८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/५१ दि.२५/०१/२०१९

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सन २०१७-१८ करीता राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क योजने करीता संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेशित विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन घेण्यात आले होते.त्या अनुषंगाने संचालनालयाचे निर्देशानुसार या कार्यालयास अर्जांची छाननी करुन अर्ज मंजुर/नामंजुर करण्याकरिता अंतिम मुदत ३०/०६/२०१८ देण्यात आली होती. या कार्यालयाने सदर मुदती पर्यंत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जापैकी त्रूटी आढळून आलेले अर्ज अमान्य करुन ऊर्वरीत पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीस मंजुरी देण्यात आली आहे.

तथापि उपरोक्त मुदतीनंतर संस्थास्तरावर अर्जांमधील त्रूटींची पुर्तता करुन पात्र विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज असल्यास संदर्भिय पत्रान्वये संचालनालयाने त्वरीत मागविलेले असल्याने सदर अर्ज छाननी करुन यादीसह या कार्यालयास तात्काळ दि.३०/०१/२०१९ पर्यंत पाठवावे.

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल/संकेतस्थळावर टाकण्याची कार्यवाहीकरीता .